# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 08.10.2026** **वार : गुरुवार**

---

1. पंतप्रधान आज मोबाईल काँग्रेसच्या 10व्या सत्राला संबोधित करणार
2. 94व्या भारतीय वायु दल दिनानिमित्त आज विविध कार्यक्रम
3. महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचं पथक राज्याच्या दौऱ्यावर
4. वस्तू आणि सेवाकर परिषदेची आज 57 वी बैठक आणि
5. आपल्या अभिनयानं रसिकांच्या मनावर राज्य करणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचं निधन

**पंतप्रधान**

दूरसंचार, डिजिटल कनेक्टिव्हिटी आणि तांत्रिक नवोपक्रम या क्षेत्रांतील देशाच्या उल्लेखनीय प्रगतीचा लेखाजोखा मांडण्याच्या उद्देशाने आयोजित 'इंडिया मोबाइल काँग्रेस'च्या 10 व्या सत्राचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीतील 'यशोभूमी' इथं करणार आहेत. या क्षेत्रातील सहकार्य, गुंतवणूक आणि नव्या संकल्पना तसंच डिजिटल नवोपक्रम यासाठी ही परिषद जागतिक व्यासपीठ उपलब्ध करून देणार आहे. मर्यादांशिवाय विस्तार अशी परिषदेची यावर्षीची संकल्पना आहे. पुढच्या पिढीसाठी डिजिटल पायाभूत सुविधा, तंत्रज्ञानावर आधारित आर्थिक विकास तसंच सुरक्षित डिजिटल परिसंस्थांचा विकास यांविषयांवर चर्चा होत आहे. दूरसंचार विभाग आणि 'सेल्युलर ऑपरेटर्स असोसिएशन ऑफ इंडिया' यांनी संयुक्तपणे आयोजित केलेला हा चार दिवसांचा कार्यक्रम काल सुरू झाला आहे.

**वायुसेना दिवस**

'भारतीय वायुदल म्हणजे- अचूक, अभेद्य आणि नेमकी सेवा' अशी मध्यवर्ती संकल्पना असलेल्या 94वा भारतीय वायुदल दिन आज साजरा केला जात आहे. भारतीय वायुदलाची सतर्कता आणि दृढ निष्ठेने देशाचे रक्षण करण्यासाठी सदैव सज्ज असल्याचं वायुदलाचे प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी काल आकाशवाणीवरून दिलेल्या संदेशात म्हटलं आहे. गेल्या वर्षीच्या 'ऑपरेशन सिंदूर'ने एकात्मिक हवाई मोहिमांची निर्णायक ताकद पुन्हा एकदा अधोरेखित केली आणि देशाच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करण्याची आपली क्षमता आणि सामर्थ्य सिद्ध केलं. असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

**जीएसटी**

वस्तू आणि सेवाकर परिषदेची 57 वी बैठक आज नवी दिल्लीतील 'भारत मंडपम' इथं होणार आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीत, विविध स्तरावरील मान्यतेसाठी लागणारा वेळ आणि खर्च कमी करण्याच्या उद्देशाने, जीएसटीशी संबंधित वाद सोडवणे आणि 'इनपुट टॅक्स क्रेडिट'ची प्रक्रिया सुलभ करणे यांसारख्या धोरणात्मक सुधारणांवर चर्चा अपेक्षित आहे. जीएसटी प्रणालीतील पुढील टप्प्यातील सुधारणांसाठी तसंच प्रशासकीय अडचणींचे सुलभीकरणासाठी पाच-सूत्री योजना मांडली जाणार आहे.

**जागतिक-बाजार**

जागतिक बाजारपेठांमध्ये अनिश्चितता निर्माण करणाऱ्या धोरणांना तसंच संरचनात्मक अतिरिक्त उत्पादन यावर तोडगा काढण्यासाठी तसंच जागतिक बाजारातील चुकीच्या धोरणांना आळा घालण्यासाठी अमेरिका आणि 13 अन्य देशांच्या अर्थव्यवस्थांमध्ये भारत सहभागी झाला आहे. अमेरिकन व्यापार प्रतिनिधी मंडळाने काल रात्री स्वाक्षरी केलेलं संयुक्त मंत्रीस्तरीय

निवेदन प्रसिद्ध केलं. 30 सप्टेंबर आणि 1 ऑक्टोबर रोजी विस्कॉन्सिनमधील मिलवॉकी इथं झालेल्या G20 संघटनेच्या व्यापार मंत्र्यांच्या चर्चेनंतर, या परिषदेत सहभागी झालेल्या 15 देशांनी स्वाक्षरी केलेले हे संयुक्त निवेदन आहे.

**पंतप्रधान**

जनतेचा विश्वास आणि कोट्यवधी कार्यकर्त्यांचा समर्पणभाव हीच आपली मोठी ऊर्जा असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली या घटनेला काल 25 वर्षे पूर्ण झाली. तेव्हापासून आधी राज्य सरकारचे आणि त्यानंतर केंद्र सरकारचे प्रमुख म्हणून ते गेली सलग 25 वर्षे कार्यरत आहेत. यानिमित्तानं काल नवी दिल्लीत झालेल्या विकसित भारत संकल्प सभेला संबोधित करताना पंतप्रधान बोलत होते.

**रेपो दरवाढ**

रिझर्व्ह बँकेनं रेपो दरात काल पाव टक्क्यांची वाढ केली आहे. त्यामुळे आता रेपो दर साडेपाच टक्के झाला आहे. बँकेनं द्वैमासिक पतधोरणाचा आढावा काल जाहीर केला. फेब्रुवारी 2023 नंतर रेपो दरात झालेली ही पहिलीच वाढ आहे. वाढती महागाई नियंत्रणात आणण्यासाठी तसंच जागतिक आणि भूराजकीय अनिश्चिततेचा सामना करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. चालू आर्थिक वर्षात देशाचा विकासदर 7 पूर्णांक 1 दशांश टक्के राहण्याचा अंदाज रिझर्व्ह बँकेनं व्यक्त केला आहे.

**एस-जयशंकर**

परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ एस. जयशंकर यांनी काल अबिदजान इथं कोत दिव्वारचे उप-पंतप्रधान आणि संरक्षण मंत्री तेने बिराहिमा ओआटारा यांची भेट घेतली. भारत आणि कोत दिव्वार दरम्यान परस्पर विश्वास, क्षमता बांधणी आणि सामायिक हितसंबंधांवर आधारित संरक्षण क्षेत्रातील भागीदारीवर चर्चा झाल्याचं जयशंकर यांनी समाजमाध्यमावरील संदेशांत म्हटलं आहे. अबिदजानमधील ही भेट जयशंकर यांच्या घाना, कोत द'दिव्वार आणि इथिओपिया या पाच दिवसांच्या अधिकृत दौऱ्याचा एक भाग आहे; या दौऱ्याचा उद्देश या तीन आफ्रिकन देशांशी भारताचे संबंध अधिक दृढ करणे हा आहे.

**कांदा दर**

देशात वाजवी दरात कांद्याची पुरेशी उपलब्धता असल्याचं केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक पुरवठा मंत्रालयानं सांगितलं आहे. खरीप हंगामात कांद्याची जास्त क्षेत्रफळावर झालेली लागवड, चांगलं उत्पादन होण्यासाठी अनुकूल स्थिती, आणि कांद्याची बाजारपेठेत झालेली समाधानकारक आवक यामुळे बाजारपेठेची स्थिती अतिशय समाधानकारक झाली आहे. पुरवठ्यातील या सुधारणेमुळे कांद्याच्या दरात आधीच्या तुलनेत घसरण पाहायला मिळत आहे. महाराष्ट्रातील प्रमुख कांदा बाजारपेठांमध्ये देखील आवक चांगली झाली असून, 16 सप्टेंबरला कांद्याचा प्रति क्विंटल सुमारे 4 हजार 30 रुपये असलेला भाव एकंदर 13 टक्क्यांनी घसरून प्रति क्विंटल सुमारे 3 हजार 475 रुपयांवर आला आहे.

**अमित शाह भेट**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. यावेळी राज्यातल्या दुष्काळी परिस्थिती संदर्भात राज्य सरकारच्या वतीनं करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती मुख्यमंत्र्यांनी  शहा यांना दिली. राष्ट्रीय आपत्ति निवारण दलाच्या  माध्यमातून महाराष्ट्राला अधिकाधिक मदत देण्यात यावी, अशी विनंती फडणवीस यांनी यावेळी केली. दरम्यान, केंद्र सरकारचं पथक आजपासून 11 ऑक्टोबरपर्यंत राज्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करून अहवाल सादर करणार आहे.

**नाना पाटेकर**

ज्येष्ठ अभिनेते आणि सामाजिक कार्यकर्ते नाना पाटेकर यांचं आज पहाटे गोव्यातल्या त्यांच्या राहत्या घरी हृदयविकाराच्या तीव्र झटक्यानं निधन झालं. ते 75 वर्षांचे होते. कसदार अभिनय, दमदार आवाज आणि वैशिष्ट्यपूर्ण संवादफेक करत नानांनी गेली अनेक दशकं रसिकांच्या मनावर राज्य केलं. नायक, सहनायक, खलनायक आणि चरित्रनायकाच्या अनेक भूमिकांमधून त्यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. विश्वनाथ पाटेकर उर्फ नाना पाटेकर यांचा जन्म 1 जानेवारी 1951

रोजी मुरुड इथं झाला. मुंबईतल्या जे.जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये त्यांनी शिक्षण घेतलं. या काळातच महाविद्यालयीन नाटकांमध्ये त्यांनी काम सुरू केलं. 1978 मध्ये 'गमन' या चित्रपटातून त्यांनी चित्रपटसृष्टीत पदार्पण केलं. पण 1986 मध्ये आलेल्या अंकुश या चित्रपटानं नानांना अभिनेता म्हणून खरी ओळख मिळाली. या चित्रपटात त्यांनी साकारलेली रवीची भूमिका अविस्मरणीय ठरली.

त्यानंतर क्रांतिवीर, परींदा, प्रहार, खामोशी-द म्युझिकल, वेलकम अशा हिंदी आणि नटसम्राट, देऊळ, पक पक पकाक, प्रकाश बाबा आमटे यासारख्या अनेक मराठी चित्रपटांतून त्यांनी विविध धाटणीच्या भूमिका साकारल्या. मराठी रंगभूमीवरही नानांनी आपल्या दमदार अभिनयाची छाप सोडली. हमीदाबाईची कोठी, पुरुष यासारख्या अनेक नाटकांमधून त्यांनी साकारलेल्या भूमिका रसिकांच्या आजही स्मरणात आहेत. चित्रपट आणि नाट्य क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना पद्मश्रीनं सन्मानित करण्यात आलं. तसंच 1995 मध्ये राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारही त्यांना मिळाला होता.

अभिनयाइतकंच सामाजिक क्षेत्रातही नानांनी उल्लेखनीय योगदान दिलं. शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि त्यांच्या आयुष्याला नवी दिशा देण्यासाठी त्यांनी, अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या साथीने 'नाम' फाउंडेशनची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी अनेक शेतकऱ्यांच्या आयुष्याला आकार दिला. नाना पाटेकर यांच्या निधनाबद्दल सर्व स्तरातून शोक व्यक्त होत आहे.

**<u>टेबल-टेनिस</u>**

टेबल टेनिसमध्ये, बीजिंग इथं सुरू असलेल्या 'चायना स्मॅश' स्पर्धेत काल भारताच्या मानुष शाह आणि दिया चितळे या जोडीने इतिहास रचला. रोमानियाच्या एडवर्ड आयोनेस्कू आणि बर्नाडेट सोक्स यांचा 3-0 असा पराभव करून, 'डब्ल्यूटीटी ग्रँड स्मॅश'च्या उपांत्य फेरीत धडक मारणारी ही पहिलीच भारतीय मिश्र दुहेरी जोडी ठरली आहे.

**<u>दिव्यांग</u>**

जपानमधल्या आईची-नागोया इथे 18 ते 24 ऑक्टोबर दरम्यान 'आशियाई दिव्यांगांसाठीच्या क्रीडा स्पर्धा' अर्थात 'आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धा' होणार आहेत. या स्पर्धेच्या उद्घाटन सोहोळयात बॅडमिंटनपटू प्रमोद भगत आणि टेनिसपटू भाविना पटेल भारतीय चमुचे ध्वजवाहक असतील.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार